एहसास

# पॅराडाईज हॉटेल

देवीप्रसाद मिश्र
अनु. शरद नावरे

ज्या हॉटेलात मी उतरलोय ते गुलाबी निऑन लाईटमधे पॅराडाइज टेबल
चिकट ग्लास आणि कप भिंतींवर ग्रीस बेडशीट असं की
जणू कीर्तन संपल्यावर झटकून इथे आंथरलंय पांघरूण
जास्तच संशयास्पद – जंगलातील लाकूड कापणाऱ्या कुणा किरकोळ स्मगलराच्या
सेक्सवर्करसोबतच्या सेक्सवर्कची बिछायत उशी कुणा मेडिकल रिप्रेझेंटिव्हच्या
औषधांची बॅग वाटतेय
हॉटेल मालकाचा तिसरा मुलगा गळ्यात सोन्याची चेन घालून फिरतो स्टेशन
जवळ माइनिंगच्या पैशाचं हॉटेल असल्याने त्याच्याकडे जो आत्मविश्वास आहे त्याची
तुलनादेखील
माझ्या हिंदी लिहीण्यासंबंधातील घसरत्या आत्मविश्वासाशी नाही करता येणार
तो माझ्या शर्ट, मोबाइल आणि एकूणच अस्तित्वाकडे तुच्छतेने पाहतो आणि विचारतो
की सगळं ठीक आहे ना सर मी म्हणतो सगळं ठीक असतं तर तुला हे हॉटेल नसतं
काढता आलं तो हसत म्हणतो की हॉटेलच्या परिसरात त्याने मंदिर
उभारलंय मां चा आदेश की कृष्ण आहे तिचा सखा बोला राधे राधे
मी बिछान्यावरून उठतो म्हणतो हाडांचा आवाज येतोय मोडण्याचा माझी
वर्षं कमी राहिल्याच्या भीतीने नव्हे तर अत्याचारांच्या परंपरेमुळे डिस्टर्बड् आहे
हॉटेलातील सगळ्यात काटकुळा कर्मचारी येऊन विचारतो की टीव्ही लावू काय तर
अचानक आठवल्याप्रमाणे म्हणालो की पंखा लाव तर म्हणाला की खराब आहे जाताना
म्हणाला की आणखी काही हवंय का तर मी म्हणालो की राईचं तेल तो खरंच
घेऊन आला आणि कुजबुजत म्हणाला की ही बाटली त्याने आपल्या खोलीतून
आणलीय की जी
हॉटेलच्या गच्चीवर आहे पॅराडाइज लिहीलंय त्याच्या बरोबर पिछाडीला
तो विचारतो की तुम्ही काय करता तेव्हा मी म्हणतो की कविता
करतो तो म्हणतो मी सांगतो ती गोष्ट तुम्ही कविता म्हणून लिहू शकता का
की हॉटेल मालकाचा दुसरा मुलगा दोन दिवसाआड गुलाबी निऑन लाईट मधे न्हाणाऱ्या
पॅराडाइजच्या पन्हाळीखाली बारा वाजल्यानंतर येतो आणि मला नागडं करून
पालथं झोपवतो मी म्हणालो की हिंदीत शील आणि अश्लील संदर्भात फार ढोंगबाजी
आहे म्हणून सत्य सांगायचे प्रकारदेखील मर्यादित आहेत – आणि बऱ्याच प्रमाणात ढोंगी
तो माझ्याकडे पाहत राहिला आणि नंतर चहा नाश्त्याच्या प्लेटस् गोळा करत राहिला
तेवढ्यात कधी तरी चुकून टीव्हीच्या रिमोटचं बटन दाबलं गेलं टीव्ही चालू झाला आणि
लोकशाहीचा दंगा सगळ्या खोलीत धूर कोंडला बरेच फॅसिस्ट खोलीत फिरायला लागले
त्यांच्यात
हॉटेल मालकाचा तिसरा मुलगादेखील होता तो असं म्हणत खोलीत शिरला
की सर सगळं ठीक आहे ना